## गानसरस्वती किशोरी आमोणकर - एक आगळा प्रकाशझोत
## लेखक: डॉ. अरुण द्रविड
## (किशोरीताईंचे ज्येष्ठतम शिष्य)



Arunji with Kishoritai

लवकरच गानसरस्वती पद्मविभूषण किशोरी आमोणकर या ८० वर्षे संपवून ८१व्या वर्षात पदार्पण करतील. त्यानिमित्ताने किशोरीताईंच्याविषयी लिहिण्याचा आज खूप वर्षांनी प्रयत्न आहे. जे लिहावे असे आहे ते त्यांच्या व माझ्या पूर्वीच्या सहवासाच्या दिवसातले. कारण गेल्या अनेक वर्षात काही अपरिहार्य कारणांमुळे दुर्दैवाने माझी आणि त्यांची गाठ पडू शकलेली नाही. अलीकडच्या या काळात ताईंचे जे परिवर्तन झाले आहे त्याची दुरून जरी असली, तरी मला खूप जाणीव आहे. आणि या परिवर्तनातून त्यांची आज जी प्रतिमा उभी आहे त्याविषयी लिहिण्यास अलिकडचा त्यांचा परिवार सक्षम आहे. तेव्हा माझ्या लिहिण्यास "ते हि नो दिवसा गताः" या भावनेची झालर लागली तर त्यात नवल नाही.

### किशोरीताईंचा दैदीप्यमान संगीत प्रवास

किशोरीताईंच्या सांगीतिक प्रवासाविषयी मी शक्य तेवढे रोख ठोक कुठलीही अतिशयोक्ति न करता लिहिणार आहे. आजकाल तोंड फाटेपर्यंत अफाट स्तुती किंवा निंदा करणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. मला उमगलेले ताईंचे संगीत १९५५ ते १९९५ या कालखंडातले आहे. त्यानंतरचा त्यांचा प्रवास मी पाहू शकलेलो नाही. माई (म्हणजे किशोरीताईंच्या मातोश्री आणि गुरु, कै. मोगुबाई कुर्डीकर) त्या वेळच्या परंपरेच्या मानाने उदारमतवादी होत्या. दुसऱ्या घराण्याचे गाणे शिकवण्यासाठी त्यांनी ताईंना अन्य गुरुजनांकडे जाण्याचे उत्तेजन दिले. जरी केसरबाई यांच्या प्रति माईंची सांगीतिक स्पर्धा होती, तरीही माईंनी ताईंना केसरबाईंकडे शिकायला पाठवले. दुर्दैवाने काही कारणामुळे हे शिक्षण झाले नाही. ताईंना अन्यहि काही गुरु होते. मोहनराव पालेकरांची ताईंना काही वर्षे तालीम होती. आग्रा घराण्याचे अन्वर हुसेन खांसाहेब यांच्याकडेही ताई १९६३च्या सुमारास शिकायला जात असत. त्याचवेळी सुटीच्या दिवसात ताईंकडे माझी तालीम सकाळी असायची. मला अजून चांगले आठवते, की ताई शेजारच्या घरी खांसाहेबांकडे बहादुरी तोडी शिकत होत्या. आपली स्वतःची तालीम तेथे आटपून त्या घरी आल्या

आल्या की माझी तालीम व्हायची. आणि मला बहादुरी तोडी शिकवायच्या. असे चार सहा आठवडे गेले. ही माझी पर्वणीच झाली! एक दिवस मला ताईंनी खांसाहेबांच्या मानसिक औदार्याचा एक मासला सांगितला. खांसाहेब ताईंना म्हणाले, "बेटी, मै जो सिखा रहा हू उसे ध्यानसे सीख लेना, मगर जब मेहफिलमे गाया करोगी, तब अपनी माँजी के ढंग से गाया करो". त्या काळात रुढीच्या कोळीष्टकात सापडलेल्या गुरुवर्यांच्या जगतात माई आणि अन्वर हुसेन खांसाहेब असे अपवाद पाहण्याचे भाग्य मला लाभले.

किशोरीताईंच्या गायनातल्या अपूर्व अशा पैलूंविषयी थोडे काही माझे विचार सांगतो. आपल्या आईकडून मिळालेले बाळकडू हा त्यांच्या गाण्याचा मूलभूत गाभा. जयपूर गायकीच्या रूक्ष आणि व्याकरणात्मक स्वरूपाला हळुवार, काव्यात्मक, आणि सौंदर्याचा लेप देण्याचे पहिले श्रेय पै. अल्लादिया खांसाहेब यांचे धाकटे बंधू पै. हैदर खांसाहेब यांना जाते. माईंना हैदर खांसाहेबांची अनेक वर्ष तालीम होती. म्हणूनच माईंची गायकी ही केसरबाईंच्या तुलनेत जास्त सौंदर्यपूर्ण वाटते. तो वारसा किशोरीताईंना आपोआपच मिळाला. पण महत्त्वाची गोष्ट अशी की त्यांनी हे सौंदर्य त्याहीपेक्षा उंच पातळीवर नेऊन पोहोचवले. ताईंच्या कारकीर्दीचे दोन ढोबळ कालखंड होतात. १९५५ पासून साधारण १९८० पर्यंत पहिला, आणि नंतरचा दुसरा. पहिल्या कालखंडात ताईंचे गाणे सौंदर्याने परिपूर्ण असूनही पारंपारिक जयपूर गायकीकडे जास्त झुकलेले होते. पुढे भावपूर्ण स्वरगुंजनावर जास्त भर आणि जयपूर गायकीच्या शिस्तीचे महत्त्व कमी. याचा अर्थ असा नाही की जयपूर गायकीची सर्व तत्त्वे सोडली. गाभा अजूनही जयपूर गायकीचाच आहे. उदाहरणार्थ स्वच्छ आणि मोकळा आकार हा त्यांचा कधीच सुटला नाही. परंतु अस्ताई अंतरे प्रत्येक वेळी जसेच्या तसे म्हणणे, आलापीत बंदिशीचे शब्द न घोळवणे, तानेचे महत्व कमी करून, दीर्घ आणि पल्लेदार गमकांच्या तानांच्या ऐवजी दुप्पट वेगाच्या सपाट ताना घेणे, अतिविलम्बित लयीत स्वरविलासात धुंद होणे इत्यादी अंगे  कर्मठ जयपूर गायकीच्या शिस्तीत बसत नाहीत. हे चांगले की वाईट याचा उहापोह येथे करण्याचे प्रयोजन नाही. ताईंच्या कंठास सुरेलपणाची देवदत्त देणगी आहे. आजार किंवा इतर काही कारणामुळे जरी दोन तीन आठवडे रियाझ बंद असला तरी, तंबोरा हाती घेऊन सूर लावले, की तंतोतंत आणि हमखास लागतात. त्याहीपुढे जाऊन ताईंनी सुराचा आणि श्रुतींचा जो अखंड अभ्यास केला आहे, त्याला एक तपश्चर्याच म्हटले पाहिजे. स्वयंभू गांधार ताईंना इतका अचूक सापडला आहे, की कोणतेही शुद्ध गांधाराचे राग त्यांच्या कंठातून प्रसवले तरी श्रोत्याचे डोळे पाणावल्याखेरीज राहत नाहीत. भूप आणि यमन हे फक्त ताईंनीच गावेत. ही किमया इतरही सुरांच्या बाबतीत तितकीच लागू होते. तोडीतला ऋषभ, गांधार, धैवत, बिभासातला धैवत, कौशी कानड्यामधले श्रुतीभेद असलेले दोन कोमल गांधार, अशी किती उदाहरणे देऊ? सुरांना शरण जायला हवे असे त्या नेहमी सांगत असतात. हे या शरणागतीचेच परिणाम नाहीत काय? काही रागांना ताईंनी इतके अपूर्व स्वरूप देवून ठेवले आहे की दुसऱ्या कुणी ते राग गाऊच नये असे वाटते. भूप, भीमपलास, जौनपुरी, शुद्ध नट, खेम कल्याण, ही काही उदाहरणे. जयपूर गायकीच्या पठडीतले काही रूक्ष राग ताईंच्या गळ्यातून रसपूर्ण होऊन उतरतात, ही काय किमया आहे? उदाहरणार्थ शुद्ध नट, किंवा जैत कल्याण. विशेषतः जैत कल्याणात सा ग प हे तीनच खडे सूर आहेत. त्यातून रसनिष्पत्ति करायची म्हणजे कर्मकठीण! त्यालासुद्धा ताईंनी अत्यंत कल्पकतेने आणि शिताफीने तीव्र मध्यम आणि धैवत या सुरांची गोलाकार मींड वापरून आणि ओझरता स्पर्श करून विलक्षण गोडी आणली आहे! मारू बिहागाविषयी दोन शब्द लिहावेसे वाटतात. माझ्या मते हा राग जयपूर गायकीमध्येच अचूक गायला जातो. मारू आणि बिहाग या दोन रागांचा हा मिश्र राग आहे हे व्याकरण फारसे कुणाला माहीत नाही. त्यात मारू आणि बिहाग यांच्या छटा बेमालून याव्या लागतात. केसरबाईंची पाच मिनिटांची रेकॉर्ड याचे एक अप्रतिम उदाहरण

आहे. ताईंचा मारू बिहाग ज्यांनी ऐकला आहे त्यांना त्याचे अनोखेपण दिसले असेलच. माझ्या माहितीप्रमाणे ताईंनी मारू बिहाग त्यांच्या सांगीतिक कारकीर्दीत फक्त दोन तीन ठिकाणीच म्हटलेला आहे.

सुरांप्रमाणे बंदिशींच्या काव्याकडे ताईंनी तसेच सूक्ष्म लक्ष दिले आहे. बुजुर्गांनी किंवा गुरुजनांनी सांगितलेले शब्द विचार न करता गायचे हे त्यांनी कधीही केले नाही. म्हणूनच "देव देव" याऐवजी "देवो देवो"; "ज्योत जगत" याऐवजी "ज्योत जलत"; "झूम रही भक्ती" याऐवजी "भूल रही भक्ती" असे आणि तत्सम अन्वयार्थाप्रमाणे योग्य वाटणारे बदल करून ताई अनेक बंदिशी म्हणतात. बंदिशीच्या आणि रागाच्या भावांचे नाते काय आहे याचा खोल अभ्यास केल्याशिवाय ताईंनी कधी खयाल सादर केला नाही. उदाहरणार्थ "देव देव सत्संग", "अनाहत आदिनाद", "देवता आदि सब" अशा बंदिशींतला भक्तिरस, "ये हो नींद ना आयी", "प्रीतम सैया" यातला विरह, "सुखकर आयी" यातली प्रेयसीची तृप्तावस्था; "धन आज दुल्हा" यातला विवाहप्रसंगीचा आनंद, या आणि अशाच अनेक भावांच्या वेगवेगळ्या छटा सांभाळून त्यांना कुरवाळीत, गोंजारीत ताईंचा कंठ क्रम करतो. काव्यातील हळुवार संवेदना सांभाळून शब्द कसे फेकावे, हे मी त्यांच्याकडून शिकलो. त्यांच्यासारखी शब्दफेक मी कुणाच्याही गळ्यातून ऐकलेली नाही. उदाहरणार्थ बिहारी रागातली "ये हो नींद ना आयी" ही विरहिणीची बंदिश गाताना "अब तो आवो" यातले आर्जव, "सजीले" या शब्दातली आर्तता, यांचा उन्मेष ताईंच्या बिहारीत होतो, म्हणूनच इतर कुणी गायलेली बिहारी ऐकण्याची इच्छा होत नाही. मला तर अगणित वेळा त्यांनी सांगितले आहे, "अरे, स्वरांना गोंजारून, त्यांच्यावर प्रेम करून गा. त्यांच्याशी दंगामस्ती करू नकोस, नाहीतर ते तुझ्यावर रुसून कायमचे निघून जातील! नुसते व्याकरण आणि तानबाजी करू नकोस. काव्य आणि सौंदर्य सांभाळ". ही सूक्ष्म दृष्टि आणि संवेदनशीलता मला ताईंनी दिली. हे ऋण मी कसे फेडणार?

क्वचित प्रसंगी ताईंची स्वरगुंजनात मशगूल होण्याची वृत्ती रागाच्या शुद्धतेचा भंग करते. पूर्वी त्यांच्यापाशी मी सातत्याने शिकत असे तेव्हा त्यांची एखादी अनवधानाने झालेली चूक मी दाखवली तर त्या उदार मनाने मानून घ्यायच्या. पहिला शिष्य म्हणून, किंवा वयात फक्त साडेबारा वर्षांचाच फरक म्हणून असेल; पण मला तसा अधिकार वाटायचा, आणि ताई तो मानूनही घ्यायच्या. मला आठवते की यमन गाताना आलापीत सा ग म प ही जागा वारंवार घेण्याची त्यांना सवय लागली होती. यातून मारू बिहाग होतो असे मी म्हटले तेव्हा म्हणाल्या,"तुझे बरोबर आहे. पुनः होऊ देणार नाही". तरी पुनः तेच होत राहिले. मग दोन तीन वेळा याची पुनरावृत्ती झाल्यानंतर यमनाचा भंग व्हायचा थांबला. काही ठिकाणी ताई सौंदर्याचा शोध घेण्याच्या ध्यासात मुद्दाम रागाच्या पारंपारिक नियमांना तडा देतात. उदाहरणार्थ त्यांची बागेश्रीतली खडा पंचम लावण्याची बंडखोरी अनेक लोकांना पचत नाही. शुद्ध कल्याण रागाचे खरे स्वरूप अत्यंत कौशल्यपूर्वक दाखवणे फार कठीण आहे. त्यावर खोल विचार करून, आणि त्याच्या सर्वांगांचा भरपूर सराव करून ताई तो मांडतात. विशेषतः त्यातील मध्यम आणि निषाद यांचे माफक पण आवश्यक स्थान तानांमधून फारसे कोणी दाखवत नाही. हे ताईंनी साध्य करून दाखवले आहे. इतकेच नव्हे, तर क्वचित प्रसंगी आरोहात सुद्धा मध्यम-निषाद यांना त्यांनी केलेला स्पर्श रोमांचकारक वाटतो. मात्र कर्मठ श्रोत्याच्या कपाळास आठ्या पडतात. शेवटी "रंजयति इति रागः" हे ताईंचे तत्त्व आहे. नियमांच्या चाकोरीत गुरफटून सौंदर्यनिर्मितीला बांधून ठेवायला त्या तयार नाहीत. हे स्वातंत्र्य किती घ्यावे हा एक वादाचा विषय आहे. त्यात मी पडणे इथे उचित नाही.

शंकराचार्यांच्या मठाकडून मिळालेली गानसरस्वती ही उपाधि किशोरीताईंना पद्मविभूषण या सरकारी सन्मानापेक्षा जास्त मोलाची वाटते. त्यांच्या गळ्यातला मिठास सुरेलपणा हा इतक्या पराकोटीचा आहे की स्वरदेवता ही उपाधीसुद्धा त्यांना समर्पक आहे. मैफिलीमध्ये तंबोरे आल्हाददायक जव्हारी काढून अचूक मिळवेपर्यंत त्या बेचैन असतात. कार्यक्रम सुरु व्हायला उशीर होतो म्हणून कधीही तडजोड नसते. त्यांच्या तंबोर्याची अत्यंत नादमधुर जोडी पंचम-निषाद किंवा मध्यम-निषाद किंवा कोमल धैवत-निषाद अशा सुरात अचूक लागली, की जे वातावरण होते, तेच नादब्रह्म. आजकाल विजेवर चालणारे तंबोरे हे नादब्रह्म कसे उभे करणार? पूर्वीच्या दिवसात त्यांची तंबोरा-जोडी लावण्याचा मान मला मिळायचा. मीच तंबोरे लावले पाहिजेत असा त्यांचा अट्टाहास असे. त्याची आठवण अजूनही कदाचित त्यांना असेल. १९८०च्या सुमारास तंबोरा स्वतः वाजवण्याचे सोडून ताईंनी स्वरमंडळ हाती घेतले. काही दिवस हा प्रयोग ऐकल्यानंतर मी एकदा त्यांना सुचवले की त्याचा एकंदर रागाच्या सादरीकरणात भर पडण्याऐवजी थोडासा उपद्रवच होतो. त्याऐवजी तंबोराच जास्त पूरक आहे. परंतु हाताला त्रास होतो म्हणून त्यांनी तंबोरा वाजवणे कायमचे सोडून दिले. स्वरमंडळ वाजवण्याचीसुद्धा एक कला आहे. ते माफक आणि व्यवस्थित रीतीने वाजवले तरच पूरक ठरते. पै. बडे गुलाम अली खांसाहेब किंवा पै. सलामत-नझाकत यांना ही कला फार सुंदर जमली होती. एखाद्या रागात आरोहात आणि अवरोहात स्वरांचा लगाव वेगळा असतो. त्यात बसत नसणारा सूर वाजला की एकदम बेचैनी होते. त्याचप्रमाणे द्रुत बंदिश सुरु झाली की ठेक्याच्या आघाताबरोबर "झाला" वाजवल्याप्रमाणे स्वरमंडळाची छेड होत राहिली की फारच त्रास होतो. हे जेव्हा जेव्हा मी ताईंना सांगत असे तेव्हा तेव्हा त्या ते मान्य करीत असत; पण कळते पण वळत नाही या न्यायाने त्यात फारशी सुधारणा झाली असे मला वाटत नाही. ही समस्या जर सोडवता आली तर आहे ते गाणे अशा उपद्रवापासून मुक्त होऊन आणखी जास्त आल्हाददायी होईल. हे माझे वैयक्तिक मत आहे. सद्भावनेने लिहिले आहे. कदाचित चुकीचेही असेल. ताईंनी वाईट वाटून घेऊ नये अशी इच्छा. गेल्या पंधरा वीस वर्षात ताईंनी प्रचलित आणि विस्तारित रागांवर भर देऊन जयपूर घराण्याच्या खासियतींना मागे ठेवले आहे. त्याची मला गेली काही वर्षे खंत वाटत अली आहे. कारण काय बरे असेल असा विचार मी करीत असतो. मी मात्र या अनवट पण सुंदर खासियती गात राहिलो आहे. काही वर्षांपूर्वी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रात मी बहादुरी तोडी, खट, देवगिरी बिलावल आणि ललत पंचम हे राग गायलो. ताई रागावल्या व म्हणाल्या, "आपल्या घराण्याचे असले कठीण राग तू कशाला गातोस? आजकालच्या श्रोत्यांपुढे हे सर्व मांडायचे म्हणजे गाढवापुढे वाचली गीता". परंतु अशा नाहक हट्टामुळे आपल्या पुढच्या पिढीला या रागांच्या सौन्दर्यापासून वंचित करण्यासाठीच का मी हे सर्व शिकलो, असा प्रश्न मनाला बेचैन करत राहतो. ताईंची मनातल्या मनात क्षमा मागतो, आणि मी सर्व काही गात राहतो. असे असूनही त्याच ताई पाच सात वर्षांपूर्वी मला एकदा म्हणाल्या "अरुण, अलीकडे जो तो उठतो आणि आपण जयपूर गायकी गातो असा दावा करतो हे मी पाहत आले आहे. खूप वर्षे तू आपल्या घराण्याचे गाणे सच्चेपणाने गातो आहेस. तेव्हा आता अशी वेळ आली आहे की तू जयपूर गायकीचे खरे स्वरूप लोकांना दाखवण्यासाठी ठिकठिकाणी या विषयावर सोदाहरण आणि सप्रात्यक्षित व्याख्याने द्यायला लाग". त्यांच्या इच्छेप्रमाणे मी पुणे विद्यापीठाच्या संगीत विभागात तीन तासांचा एक कार्यक्रम सदर केला. तसेच अमेरिकेतही मी असे थोडे कार्यक्रम केले आहेत. हा उपक्रम अजूनही शक्य तितका चालू आहे.

साधारणपणे १९८०च्या नंतरच्या काळात ताईंनी गाण्यातली अष्टांगे गायलीच पाहिजेत हा अट्टाहास सोडून दिला, आणि ते योग्यच झाले. अशा बंधनात गुरफुटून राहणे हे सृजनशीलतेला घातकच ठरणार. परंतु संगीतात तान

हे अंगसुद्धा असण्याचे कारण नाही, किंवा अतिशय गौण स्वरुपात असावे असा पवित्रा अलीकडे ताईंनी घेतला आहे. त्यामुळे जयपूर गायकीतली लांब, पल्लेदार, आणि गमकेच्या पेचांनी डौलदार झालेली तान जशी त्या पूर्वी दाखवीत असत तशी आता दाखवीत नाहीत. जशी माईंना देवाने दमसासाची देणगी दिली होती, तशी ताईंना दिली नाही, हे त्याचे कारण असू शकेल का? अनेक वेळा मला ताईंनी म्हटले आहे, "तू माझ्यासारखे का गात नाहीस?" यावर मी नेहेमी त्यांना सांगतो "ज्या काळात मी तुमच्यापाशी शिकलो त्या काळात तुमची जी गायकी होती तीच मी गायचा प्रयत्न करीत असतो. पुढे तुम्ही गायकीचे जे परिवर्तन केले ते त्यानंतरचे विद्यार्थीच गाऊ शकतील, हे खरे नाही का? मग माझा काय दोष?" उलट मी तर स्वतःला अलीकडच्या शिष्यपरिवाराच्या मानाने जास्त भाग्यवान समजतो. एकतर मला ताईंच्या बरोबर माईंची गायकी अभ्यासण्याचा मौका मिळाला, आणि दुसरे तर ताईंच्या त्या वेळच्या गायकीत भावसौन्दर्य आणि जयपूर गायकीच्या अष्टांगबद्धतेचा अप्रतिम संगम झाला होता. त्यामुळे मी ताईंची आजची गायकी न गाता पूर्वीची गायकी आणि पूर्वी शिकलेल्या राग-रागिण्या गातो याचा मला आनंदच आहे.

शास्त्रीय संगीताशिवाय किशोरीताई ठुमरी, भजन, अभंग वगैरे प्रकार अत्यंत सुलभतेने गातात. अगदी तरुणपणीचे गाणे सोडले तर ताई ठुमरी पुढे फारश्या गायल्या नाहीत. त्याचप्रमाणे नाट्यसंगीत गाणे ताईंना कधीच रुचले नाही. गायल्या असत्या तर त्यातही त्यांनी अग्रगण्य स्थान पटकावले असते. आध्यात्मिक भजने आणि अभंग ताईंना जास्त भावतात. ज्ञानेश्वरीवर आधारित "तोचि नादु सुस्वर जाला" हा मोठा तीन तासांचा कार्यक्रम सर्वश्रुत आहे. तसाच संत मीराबाईच्या जीवनावर आधारित "मगन हुई मीरा चली" हा कार्यक्रमही सर्वश्रुत आहे. या दोन्ही कार्यक्रमातील सर्व गाण्यांच्या हृदयस्पर्शी चाली ताईंच्या स्वतःच्या आहेत. इतरही प्रयोग ताईंनी तरुणपणी करून सोडून दिले. मला वाटते, फक्त "हा माझ्या हातचा मळ आहे" हे स्वतःला दाखवून देण्यासाठी! उदाहरणार्थ "गीत गाया पत्थरोने" हे त्यांचे सिनेमातले गाणे, गोविंद निहलानी यांच्या एका चित्रपटासाठी गायलेली पार्श्वगीते, "प्यार के कबिल नही है ये जहा तेरे बगैर" ही भैरवीतील गझल, "उघड उर्मिले कवाड", "रे निर्मोही" वगैरे मुंबई आकाशवाणीसाठी "मासिक भावगीत" या सदरात गायलेली भावगीते, काही वर्षापूर्वी हृदयनाथ मंगेशकर यांनी स्वरबद्ध केलेली भावगीते, १९६३च्या सुमारास पु. ल. देशपांडे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली "बिल्हण" या संगीतिकेत कै. जितेंद्र अभिषेकी. कै. शोभा गुर्टू, श्री रामदास कामत यांच्या बरोबर कवि बिल्हण याच्या प्रेयसीच्या भूमिकेत म्हटलेली अत्यंत सुंदर गाणी, या आणि अशा अनेक वेळी ताईंनी आपली सर्वगुणसंपन्नता दाखवून दिलेली आहे.

**किशोरीताईंचा संगीताद्वारे आध्यात्मिक प्रवास**

संगीताचे अध्यात्माशी असलेले नाते हा किशोरीताईंचा आवडता विषय. किंबहुना, ताईंची वृत्ति लहानपणापासून आध्यात्मिक असल्याने हे नैसर्गिकच आहे. संगीत हे करमणुकीचे माध्यम नसून ते आत्मशुद्धीचे, मोक्षप्राप्तीचे साधन आहे ही त्यांची धारणा त्यांच्या गायनात ओतप्रोत भरलेली असते इतकेच नव्हे, तर श्रोत्यालासुद्धा स्वरगंगेतून आध्यात्मिक शांतीचा अनुभव येत असला पाहिजे. एरव्ही, प्रसंगी त्याचे डोळे का पाणावतील? ताईंनी संगीताच्या आणि अध्यात्माच्या नात्याविषयी गहन लिखाण केले आहे हे त्यांच्या स्वरार्थरमणी आणि कै.मारुलकरांनी लिहिलेल्या "गानसरस्वती" पुस्तकाच्या काही पानांमधून आपण वाचू शकतो. ज्या लोकांनी त्या दोन्ही ग्रंथांचे परीक्षण करून तारीफ केली आहे, त्यांच्या बुद्धिमत्तेचे मला कौतुक वाटते, आणि हेवाही वाटतो.

कारण अगदी प्रामाणिकपणे सांगायचे म्हणजे ते लिखाण मला समजावे अशी तळमळ आहे, पण माझ्याच आकलनशक्तीची मर्यादा आड येते आहे. असो.

**माझ्या शागीर्दीचा काळ**



*किशोरीताईंना साथ करताना अरुणजी*

किशोरीताई तिशीत होत्या, आणि मी विशीत होतो तेव्हा खरी माझी किशोरीताईंपाशी शागीर्दी झाली.त्या दिवसातल्या काही वेचक आठवणी सांगाव्या असे वाटते. किशोरीताईंचा आणि माझा प्रथम परिचय (त्यांच्या नकळत) त्यांच्या घरी १९५७ च्या सुमारास झाला. "नकळत" अशाकरिता, की मी शाळेत असताना माझ्या भावाबरोबर उल्हास कुर्डीकर (किशोरीताईंचे बंधू) यांची ओळख काढून माईंना (म्हणजे किशोरीताईंच्या मातोश्री पद्मभूषण कै. मोगुबाई कुर्डीकर यांना) भेटायला गेलो होतो. घरात किशोरीताई होत्या, पण त्यांच्याशी बोलण्याची काही संधि आली नाही. त्यानंतर माझा भाऊ विजय याच्या कॉलेज मध्ये (VJTI) कॉलेजचे त्या वेळचे कलाप्रमुख आणि माझे मावस भाऊ अरुण दाते यांनी किशोरीताईंची एक सकाळची मैफिल आयोजित केली होती. ताईंच्या मागे तंबोरा वाजवायला बसलो होतो. तेव्हा त्यांनी मला वळून विचारले "मी तुला केव्हातरी माझ्या घरी पहिले आहे का?" त्यांचा रेडिओवरील प्रत्येक कार्यक्रम मी नियमितपणे आणि भारावून ऐकत असे. त्यानंतरहि काही वर्षे मी शाळेतच होतो, आणि माझी तालीम पै. मजीद खान साहेबांकडे चालू होती. पुढे १९६१ साली माझा आणि ताईंचा औपचारिक परिचय कै. वामनराव देशपांडे यांच्या मध्यस्थीमुळे झाला आणि ताईंच्याकडे माझी नियमित तालीम सुरु झाली. त्यानंतरचा सहा वर्षांचा काळ हा माझ्या सांगीतिक जीवनातील सुवर्णकाळ ठरला. त्या काळात मी पवईला आय आय टी मध्ये विद्यार्थी होतो. परंतु शनिवार-रविवार आणि प्रत्येक सुटीतला सर्व वेळ मी संगीताच्या अध्ययनात घालवला. आमच्या डिरेक्टर साहेबांनी मला दर वीकेंडला गाण्याच्या तालमीसाठी घरी जाण्याचा खास परवाना दिला होता. (माझ्या वर्गबंधूंचा हेवा समजून घ्यावा!) या काळात माझ्या भाग्यामुळे मला माईंचासुद्धा

सहवास आणि मार्गदर्शन मिळाले. माई ज्येष्ठ शिष्यांना (कै. कमल तांबे, वामनराव देशपांडे, कौसल्या मंजेश्वर, इत्यादी) शिकवत असत तेव्हा मी तेथे बसून जे कानावर पडे ते आत्मसात करण्याचा मनोमन प्रयत्न करीत असे. माई सुद्धा म्हणायच्या "अरे, नुसता बसू नकोस, मनातल्या मनात तू पण अस्ताई पाठ करून घे". त्यामुळे माझ्या गायनात माईंच्या गाण्याचा बराच प्रभाव दिसत आलेला आहे. एकदा दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रात माझा कार्यक्रम झाल्यानंतर श्रीमती धोंडूताई कुलकर्णी मला म्हणाल्या "तुमच्या गायकीत पन्नास टक्के माई आणि पन्नास टक्के किशोरीताई दिसतात".

हा सगळा इतिहास सांगण्याचे कारण असे की कोणत्या कालखंडात ताईंच्या व्यक्तिमत्त्वाचा  आणि सांगीतिक प्रतिभेचा मला निकटचा परिचय झाला हे मला सांगावयाचे आहे. तो काळ असा होता, की जेव्हा खिशात बसणारे एम पी ३ रेकॉर्डर्स नव्हते. असते तरी तालीम रेकॉर्ड करण्याची परवानगीहि मिळाली नसती. पटकन बंदिशीचे शब्द किंवा रागाचे चलन सेल फोनवर लिहून घेण्याची सुविधा नव्हती. मला अजून आठवते की तालीम झाली की ताईंच्या घरी रेंगाळत बसायचे, बंदिशीच्या जागा गुणगुणत वेळ काढायचा, आणि घरी परत जाताना बसच्या प्रवासात ताईंनी सांगितलेल्या आणि मला भावलेल्या जागांची गुणगुणत उजळणी करायची. अशाकरिता, की त्या विसरता नयेत! आजच्यासारखी, तालमीला यायचे आणि तालीम संपल्याबरोबर धावत पळत दुसऱ्या उद्योगाला लागायचे, केव्हा तरी सावकाशीने रेकॉर्डिंग ऐकून उजळणी करायची, अशी परिस्थिती नव्हती. शिष्याचा गुरूगृही प्रवेश म्हणजे गुरूच्या संपूर्ण जीवनात प्रवेश होत असे. निदान माई आणि ताई यांच्याकडे गुरुत्वाची अशी धारणा होती. सुरुवात जरी भीतीयुक्त आदराने वावरण्याची असली, तरी कालांतराने संगीताची तालीम हा एकच घटक न उरता गुरूशी जीवाभावाचे, सुख-दुख्खाचे, प्रेमाच्या जवळिकेचे नाते जुळत असे. त्यामुळे ताई आणि माई आणि त्यांचा कुटुंब परिवार (ताई तेव्हा माईंच्या घरी कुटुंबासह राहायच्या) यात मी दुधात साखर विरघळावी तसा एकरूप होऊन गेलो होतो. माईंच्या घरी सुखाच्या प्रसंगापेक्षा दुख्खाच्या घटनांचे पारडे बहुधा जड असायचे. कुटुंबिक, नातेवाईक, आणि इतरही सर्वांवर उदार हस्ताने प्रेमाचा वर्षाव करणाऱ्याची हीच दशा असते. त्यात कुणालाही न दुखवण्याचा माईंचा स्वभाव. आणि माईंच्या मनाला अळवावरच्या थेम्बाप्रमाणे सांभाळण्याचा, पारिजातकाच्या फुलाप्रमाणे जपण्याचा ताईंचा कटाक्ष. या शृंखलेमुळे ताई-माई यांच्या घरी सदैव मानसिक क्लेशांचीच  रेलचेल असे. गाण्याची तालीम अशा वातावरणात जरी झाली, तरी त्यामुळेच की काय, तालमीला एक वेगळेच तेज चढत असे. ताईंच्या घरातल्या अनेकविध समस्या आणि चढउतार यात सहभागी होऊन त्यात माझी जशी मी चवली-पावलीची मदत केली, तशीच ताईंनीही माझ्या कॉलेजातल्या घडामोडीमध्ये आस्था ठेवली होती. एकदा माझे एक खूप लिहून तयार केलेले जर्नल कुणीतरी पळवले. तेव्हा ताईंनी रोज माझ्यासाठी देवाचा धावा केला, आणि काही दिवसांनी ते जर्नल मला परत मिळाले. एकदा आय आय टी मध्ये मी आजारी पडून हॉस्पिटलात दाखल झालो होतो. तेव्हा माझ्या घरी मुंबईला कोणीच नव्हते. याचा सुगावा लागताच ताई हॉस्पिटलात येऊन पोहोचल्या आणि मला taxi मध्ये घालून घरी घेऊन गेल्या. आय आय टी च्या अंतिम परीक्षेच्या आधी मी महिनाभर तालमीला येणार नाही म्हटले तेव्हा ताई रागावल्या नाही तरी खूप रुसल्या होत्या. पण निकाल झाले आणि मी पहिला येउन मला राष्ट्रपतींचे सुवर्ण पदक मिळाले तेव्हा माझ्यापेक्षा कितीतरी पटींनी त्यांचाच जीव भांड्यात पडला! पुढे मी अमेरिकेला डॉक्टरेट करण्यासाठी गेलो, तेव्हा माझी तालीम खंडली. अशी त्या काळात गुरु-शिष्यांची जवळीक असायची. ताईंच्या इतर शिष्यांनासुद्धा हा अनुभव आलेला आहे.

**किशोरीताईंच्या व्यक्तित्वाचे पैलू**

किशोरीताईंसारखे शुद्ध, निरागस, लाघवी आणि प्रेमाने ओतप्रोत भरलेले असे मन क्वचितच पाहायला मिळते. स्वाभिमानाचा ताठा, आपल्या आईविषयीचा गर्व, आपल्या गुरूंच्या विषयी असीम निष्ठा, आपल्या दोन अपत्यांची जीवघेणी काळजी (निहार आणि बिभास त्या वेळी लहान बालक होते), नेमाने देवपूजा करण्याचा दंडक, मग आजार असो किंवा कामे असोत! देवावरची असाधारण श्रद्धा, याखेरीज साधे कपडे, फारसे अलंकार नाहीत, घराबाहेर असताना डोक्यावर पदर असलाच पाहिजे, माईंच्या या व तत्सम अनेक शिकवणुकींचा आदर करून राहण्याची वृत्ति, शुभ-अशुभावर अपरिमित श्रद्धा, इतकी, की प्रत्येक कार्यक्रमाला तीच गडद लाल रंगाची साडी विरून जाईपर्यंत वापरावी! माईंप्रमाणे ताईंनी कधीही  कुणाशी खोटेपणा केला नाही. हे ताईंच्या त्या वेळच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू होते. आपल्या सावळ्या वर्णाचा आणि पोपटी नाकाचा त्यांना थोडासा न्यूनगंड जरी असला, तरी त्यांची त्याविषयी विनोद करण्याची वृत्तीसुद्धा होती. आपल्या वर्णाविषयी म्हणायच्या, कृष्णाची राधासुद्धा सावळीच होती की! आणि नाकाविषयी अभिमानाने स्वतःला शिवाजीची वंशज म्हणायच्या!

दिलेला शब्द पाळण्याची शिस्त आणि महाराष्ट्रावरची असीम निष्ठा या ताईंच्या दोन गुणांचा एक मासला सांगतो. एकदा अमृतसरला कार्यक्रम होता. एकाच रात्रीचा कार्यक्रम होता, आणि त्याची बिदागी ठरली होती. दुसऱ्या दिवशी राहून तिसऱ्या दिवशी भल्या पाहते रेल्वेने परतीचा प्रवास होता, कारण मुंबईला लगेच महाराष्ट्रदिना निमित्त कार्यक्रम होता. तो विनामूल्य होता. ताईंच्या बरोबर मीही गेलो होतो. कार्यक्रम उत्तम पार पडला. दुसऱ्या दिवशी पंडित भीमसेनजींचे गायन होते. परंतु तिसऱ्या दिवशी सकाळी आणखी एक मैफिल केली तरच बिदागी देऊ अशी संस्थाचालकांनी ताईंना अट घातली. दिवसभर वादविवाद करूनही त्यांनी दाद दिली नाही. शेवटी पंडितजींना विनंती केली, की तुम्ही कसेही करून संस्थाचालकांना वठणीवर आणा. भीमसेनजी रात्री उशिरापर्यंत परतले नव्हते. शेवटी पहाटे त्यांच्या खोलीत जाऊन त्यांना उठवून काही झाले का हे विचारण्याचा प्रसंग माझ्यावर आला. आणखी एक कार्यक्रम केल्याखेरीज बिदागी मिळणार नाही असेच उत्तर आले. ताईंनी मला सांगितले, "चल, सामान उचल, रिक्षा घेऊन स्टेशन गाठूया. अशा तऱ्हेने फसवणूक करणाऱ्या लोकांच्या पैशांची मला किंमत नाही. जरी बिदागी नसली तरी महाराष्ट्राला दिलेला शब्द मला जास्त मोलाचा आहे!"

ताईंच्या श्रद्धेचा आणि भोळ्या, शकून-अपशकून मानणाऱ्या वृत्तीचा एक मासला देतो. एकदा मुंबईला कै. सुरेश हळदणकर यांच्या दादरच्या क्लासमध्ये रविवारी सकाळी कार्यक्रम होता. आदल्या दिवशी सायंकाळी त्यांच्याबरोबर एके ठिकाणी मी बसलो असताना एका भामट्याने त्यांची पर्स पळविली. त्यात राघवेंद्रस्वामीजींचा प्रसाद होता. त्यानंतरची ताईंची अवस्था सांगणे अशक्य आहे. मोठ्या प्रयासाने मी त्यांना शांत करून, समजूत घालून घरी आणले, आणि जरी माझा हवालदिल होण्याइतका देवादिकावर विश्वास नव्हता, तरी त्यांच्या मनःशांतीसाठी मी रातोरात देवळात जाऊन पूजा सांगून देवाचा प्रसाद आणि अंगारा एका पुरचुंडीत बांधून त्यांना आणून दिला. त्यांना म्हटले, "तुमच्या कंठातून सरस्वती गाते. तुम्हाला कोणी काहीही करू शकत नाही. हा देवाचाच प्रसाद आहे, तो जवळ ठेवा, आणि शांतपणे स्वरगंगेत स्वतःला झोकून द्या." त्या कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग अजून माझ्यापाशी आहे. तम्बोर्यावर माझा आवाज आहे. त्या काळी मीच तंबोर्याची साथ करीत असे. श्रीमती माणिक भिडे यांची तालीम अजून सुरु झालेली नव्हती. मोहन नाडकर्णी यांनी एकदा टाईम्स मध्ये अभिप्रायात माझ्या पुरुषी

आवाजातील साथीविषयी  लिहिले की "the experiment was most discordant and undiscerning". त्यानंतर मी ताईंना मला तंबोर्यावर पुनः न बसवण्याची गळ घातली, पण ताईंनी अशा अभिप्रायांना धुडकावून, हट्टाने प्रत्येक कार्यक्रमात मलाच मागे बसविले. ताईंना कार्यक्रमासाठी गाडीत बसवून नेण्याचे काम नेहेमी माझे असायचे. कित्येक वेळा माझा हात घट्ट धरून विचारायच्या "माझी डावी पापणी फडफडते आहे; कार्यक्रम फेल तर होणार नाही न रे?" किंवा "कालपासून सारखा खोकला येतोय रे; माझे कसे होणार?" अशा प्रत्येक वेळी नैतिक आधार द्यायचा हे एक नियमित माझे काम असे. एकदा आतल्या खोलीत राघवेंद्र स्तोत्र म्हणून झाले, की मग रंगमंचावर आपल्या स्वरांना शरण जाऊन जेव्हा त्यांची समाधी लागते, तेव्हा हे आतले सर्व तांडव शांत झालेले असते. बाहेरून ताई खूप अलिप्त आणि प्रसंगावर स्वामित्व  दाखवून असतात, पण अनेक वेळा आतून त्यांची अशी मांजराच्या बावरलेल्या पिल्लासारखी झालेली अवस्था फार थोडे लोक पाहू शकतात. या वेगवेगळ्या लहान प्रसंगांची आज ताईंना आठवणही नसेल, पण माझ्या मनात त्यांनी कायमचे घर केलेले आहे. प्रसंग जरी फुटकळ असले, तरी त्यांतून ताईंच्या हळुवार पण तत्वनिष्ठ स्वभावाची झलक दिसते, म्हणून या आठवणी सांगितल्या.

किशोरीताईंच्या सांगीतिक प्रतिभेखेरीज कलेचे त्यांचे आणखी दोन पैलू पुष्कळांना माहीत नसतील. ताई अत्यंत सुंदर रांगोळीची चित्रे काढू शकतात. चाळीस पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत दर दिवाळीच्या वेळी एक मोठे रांगोळी-चित्र सात आठ दिवस राबून त्या काढत असत. मी एकच असे चित्र पहिले आहे - लैला मजनू यांचे. इतकी सुंदर रांगोळी-कला मी फारशी कुठे पाहिलेली नाही. दुर्दैवाने त्यानंतर ताईंनी पुनः रांगोळी-चित्रे काढल्याचे मला आठवत नाही. दुसरा गुण म्हणजे काव्यगुण. ताईंचे आध्यात्मिक लिखाण आता प्रसिद्ध झाले आहे. परंतु  ताई अप्रतिम कवयित्री आहेत हे किती लोकांना माहीत आहे? दुर्दैवाची गोष्ट एकच आहे - कुठल्या तरी चिटोर्यावर सुचेल तशी कविता लिहून तो कुठे तरी ठेवून द्यायचा अशी बेफिकीर वृत्ती! मी त्यांच्या काही कविता अशाच चिटोर्यावर वाचल्या आहेत. कसेही करून त्या शोधून त्यातल्या चांगल्या कवितांचा संग्रह झाला पाहिजे.

सर्वसाधारण जनतेला अनाकलनीय वाटणाऱ्या ताईंच्या अंतर्मनाचे एक अतिशय जाज्वल्य उदाहरण द्यावेसे वाटते. कारण  त्यातून ताईंच्या अंतरंगाला किती थोड्या लोकांनी ओळखले आहे ते कळते. १० फेब्रुवारी २००१ हा माईंचा वैकुंठगमनाचा दिवस. हिंदुजा हॉस्पिटलमध्ये रात्री माईंची प्राणज्योत ज्या क्षणी मालवली त्या क्षणानंतरचे ताईंचे जे स्वरूप तिथे असलेल्या आप्तेष्टांनी पहिले ते धक्कादायक होते. डोळ्यात एकही अश्रू नाही, चेहरा रागाने लाल झालेला, आणि क्रोधाच्या भरात करड्या आवाजात "माईला घरी आणू नका - सरळ स्मशानात न्या" ही भाषा. कोणीही त्यांना शांत करू शकले नाही. पण मी मात्र ताईंचा प्रक्षोभ का झाला हे अचूक ओळखले, आणि म्हणूनच, महत्प्रयासाने मी त्यांना शांत करू शकलो. ताईंचा त्या क्षणीचा क्रोध कुणा व्यक्तीवर नव्हता. तो क्रोध काळावर, यमावर, देवावर होता. त्यांचे अंतर्मन या सर्वांना विचारीत होते, "काय म्हणून तुम्ही माझ्या आईला, गुरूला घेऊन गेलात? कोणत्या अधिकाराने तुम्ही संतत्वाला पोहोचलेल्या  माझ्या माईला माझ्यापासून दूर नेलेत? आता तिच्या निर्जीव कायेला घरी कशाला नेऊ?" क्रोधाग्नीच्या या भडक्यात डोळ्यातली आसवेसुद्धा आतल्या आत भस्मसात झाली होती, मग ती कुणाला कशी दिसावीत? त्या प्रसंगी ताईंच्या हळुवार हृदयातून शोकाऐवजी क्रोध उतू जावा, याचे हेच एक कारण होते. "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि॥ लोकोत्तराणां चेतांसि कोऽहि विद्न्यातुमर्हति ॥" या उक्तीप्रमाणे फुलापेक्षा नाजुक असणारे मन त्या क्षणी वज्रापेक्षाही कठोर झाले, हा ताईंच्या

लोकोत्तरतेचा एक आविष्कार तर नसेल ना, ही विचारार्ह गोष्ट आहे.

मी साहित्यिक नाही. केमिकल इंजिनिअर आणि जयपूर गायकीचा उपासक. तेव्हा मी जे काही लिहिले आहे त्यात साहित्यिक गुण अभावानेच तळपणार! भारदस्त, संस्कृतप्रचुर शब्दांनी अनाकलनीय केलेले हे भाष्य नाही, किंवा असलेल्या गुणांना परमोच्च विशेषणांनी ओ येईपर्यंत सजवलेला कृत्रिम साज नाही. हे फक्त हृदयातल्या खोलवरच्या दालनातून आलेले, सोप्या भाषेतले, पण प्रामाणिक आणि आर्त विचारप्रदर्शन आहे. थोडेसे परखड लिहिले असले तरी ते प्रामाणिक आहे. प्रेमानेच लिहिले आहे. भावनाबद्ध होऊन पण भावनेच्या आहारी न जाता लिहिले आहे. जे जसे दिसले, बरे अथवा वाईट, ते तसेच लिहिले आहे, कुणाचीही तमा न बाळगता. हा माझा लहान तोंडी मोठा घास तर नाही ना, अशीही मनाला हुरहूर वाटून राहिली आहे. यात कुणालाही दुखवण्याचा हेतू नाही. कुणाला वाईट वाटले तर मला क्षमा असावी. किशोरीताई, त्यांचे व्यक्तित्व, त्यांचे संगीत आणि संगीताव्यतिरिक्त इतर गुण-दोष यांवर अनेकांनी खूप काही लिहिलेले आहे. काही थोडे पैलू अजूनही अंधारात राहिले असतील तर त्यांवर उजेड टाकण्याचा हा प्रयत्न आहे. त्याचा त्याच मनोभावाने, वजन-माप न मोजता स्वीकार व्हावा.

किशोरीताईंच्या जन्मदिनानिमित्त देव त्यांना दीर्घायुरारोग्य देवो, आणि त्यांच्या हातून संगीतातील सौन्दर्यसृजन असेच अबाधित चालू राहो ही परमेश्वरचरणी प्रार्थना.

*****